Reviews of Literature
Volume 1 , Issue 4 / Nov 2013 ISSN:-2347-2723

# राणोजी घोरपडे कापशीकर

*आरती बी. नाडगौडा*

देवचंद कॉलेज, अर्जुननगर ता. कागल, जि. कोल्हापूर.

**सारांश :**

महाराष्ट्रात छत्रपतींना स्वराज्य निर्मितीच्या कार्यामध्ये ज्या पराक्रमी घराण्यांनी महत्वाची कामगिरी बजावली त्यामध्ये कापशीकर सेनापती घोरपडे घराणे महत्वाचे ठरते. या घराण्याचा मुळ पुरूष वल्लभजी असून हे घराणे नवकस व सातकस अशा दोन शाखामध्ये विभागला गेला.

**प्रस्तावना :**

पूर्वी या घराण्याने बहामनी संस्थापक हसन गंगु बहामनी यांच्याकडे सेवा केली. खेळण्याच्या लढाईत पराक्रमाबद्दल हसन गंगुने त्यांना राजा घोरपडे बहादुर हा किताब दिला.[1] पुढे छत्रपती शिवाजी महाराज नंतर संभाजी यांच्या काळात देखील सेवा बजावली व पुढे करवीर राज्याचे छत्रपती दुसरे शिवाजी यांनी मालोजी घोरपडे याला सनद दिल्याचे दिसतो. राजाराम महाराजांच्या काळात तुळजापूर छावणीतील औरंगजेबाच्या तंबुवरील कळस कापण्याचा पराक्रम संजातीने केला होता. त्याच्या कडक स्वभावाने अनेक लोक दुखावले गेले. याची परिणिती धनाजी जाधव व नागोजी माने हे विरोधी गेले.[2] तर राजाराम महाराजांनी याबाबत संताजीची कान उघडनी केली. यापुढे शेवटी जून 1697 मध्ये संभाजीचा नागोजी माने (म्हसवडकर) याने वध केला.[3]

सेनापती संताजीराव घोरपडे यांच्या निधनाने घोरपडे घराण्याच्या पराक्रमी परंपरेचा एक महत्वाचा अध्याय संपला संताजीच्या निधनानंतर स्वाभाविकच धनाजीला मराठे सरदारांत श्रेष्ठ स्थान प्राप्त झाले.[4] संताजीच्या दोन्ही पत्नी सोयराबाई व द्वारकाबाई यांची मुले राणोजी व पिराजी यांचा ही घोरपडे घराण्याच्या इतिहासाशी निकट संबंध आलेला आहे.

संताजीच्या निधनानंतर संताजीचा भाऊ बहिर्जी घोरपडे व त्याचा मुलगा राणोजी यांची परशुरामपंत प्रतिनिधी यांनी एकी घडवून आणली काही कारणांनी त्यांच्यामध्ये जे विवाद उत्पन्न झाले होते ते घोरपडे घराण्याच्या दृष्टीनेही अनिष्ठ ठरणारे होते आणि म्हणूनच बहिर्जी व राणोजी यांची दिलजमाई घडून आली ही गोष्ट या घराण्यात पुढे घडलेल्या घटनांच्या दृष्टीनेही योग्य झाली.

राणोजीचा जन्म 1679–80 च्या सुमारास झाला. संताजीचा वध झाला त्यावेळी राणोजीचे वय साधारणपणे सतरा–अठरा वर्षाचे असावे. संताजीच्या वधानंतर पुढे पाच–सहा वर्षे राणोजीने आपल्या बापाप्रमाणे मोगल सैन्याशी हिरीरीने सामना केला.[5]

**धनाजी राणोजी दिलजमाई**

फारसी इतिहासकारांच्या माहिती प्रमाणे राणोजी व धनाजी जाधव यांचे संबंध सलोख्याचे नव्हते. ते एकमेकांचा द्वेष करीत होते. आपल्या बापाच्या मृत्यूला धनाजी कारणीभूत होता ही गोष्ट राणोजी विसरणे शक्य नव्हते. म्हणून राणोजी आणि धनाजी यांच्या फौजा एकमेकांचा पाडाव करण्यासाठी योग्य वेळेची वाट पहात होत्या. धनाजी जाधव आपल्या फौजेनिशी गुलबर्ग्याकडे येऊन राणोजींशी तडजोडीचे बोलणे करण्याचे

ठरविले. राणोजीने धनाजीचा काही प्रमाणात विश्वासही संम्पादन केला व त्यांनी एकमेकांचा अलमेला मुक्कामी गाठ घेण्याचे ठरविले.

जुल्फिकारखानचा दृष्टीने राणोजी आणि धनाजी यांचे सख्य अनिष्ट असल्याने त्याने आपले बाजार बुणगे सोलापूरला पाठविले. तो स्वतः मराठयांचा पाठलाग करीत नळदुर्गपर्यंत आला होता. त्याने लगेच अलमेल्याच्या रोखाने आपला मोर्चा वळविला धनाजीने मोगल फौजेशी लढाई करून त्यात त्याचा मोड झाला.[6] गुलबर्ग्यापासून आठ कोसावर असलेल्या फिरोजाबाद जवळ धनाजी व राणोजी यांची भेट ऐक्यात घडून आले. मराठयानी फिरोजाबादची बाजारपेठ ताब्यात घेतली आणि मुघल सैन्याचा सामना करण्यासाठी उभे राहिले. मोगलांचे सैन्य केवळ 3000 व मराठयांचे सैन्य 35000 असून सुध्दा मराठयांचा पराभव झाला.

## आठ महिने लढा

मराठयांची छावणी फिरोजाबाद नजीक भीमेच्या दुसऱ्या काठावरची मोगल सैन्याच्या दृष्टिपथात आली. मोघलांनी नदी ओलांडून मराठयांच्या छावणीवर हल्ला करण्याचे ठरविले मुघल नदीकडे वळले हि संधी पाहून मराठयांना आपला तळ हलविला आणि मुघल नदी ओलांडत असताना त्यांच्यावर हल्ले चढविले. मुघलांनी बान आणि बंदुकी चालवून मराठयांचे हल्ले परतविण्याचा प्रसत्न केला. मुघलांच्या आघाडीवरच्या दाऊतखानने नदी ओलांडली पण त्यामुळे तो मुघलसैन्याचा इतर तुकडयापासून लांब गेला हे पाहून राणोजी आपल्या प्रचंड सैन्याबरोबर दाऊत खानवर तुटून पडला.

अशी ही लढाई (1699–1700) आठ महिने चालू होती.[7] या लढाईत मराठयांचा पराभव झाला. मुघलासमोर टिकाव न धरता धनाजी हा पन्हाळयाकडे आणि राणोजी वाकीण खेडयाकडे निघून गेला.

## साताऱ्यानजीक लढाई

मराठयांच्या फौजा आणि मोगल सैनिक यांच्यामध्ये 10 जानेवारी 1700 रोजी रहमतपूरपासून सहा मैलावर लढाई झाली.[8] मुगलांच्या बाजूनी जुल्फिकारखान बक्षी बहरमंदखान आणि हमीदुद्दीनखान हे तीन सेनानी होते तर मराठयाच्या लष्करी आघाडीचे नेतृत्व धनाजी जाधव, हनमंतराव निंबाळकर आणि राणोजी घोरपडे यांच्याकडे होते.

आणखी एका प्रसंगी रोणोजीने शौर्य गाजविल्याचा उल्लेख आढळतो. औरंगजेबाच्या फौजा पन्हाळयाकडे गुंतल्या होत्या. त्यावेळी मराठयांनी सातारा विजापूर भागात लष्करी चढाया सुरू केल्या. हणमंतराव निंबाळकराने 16 ऑगस्ट 1700 रोजी खटाववर हल्ला करून ठाणेदाराला ठार केले. त्याचवेळी राणोजी घोरपडे याने विजापूर जिल्हयातील बागेवाडी या मोगल ठाण्यावर हल्ला चढवून ठाणेदाराला ठार केले.[9] व नंतर विजापूर शहराच्या ईशान्येस असलेले इंडीचे ठाणेही हस्तगत केले.

## दोन महत्वाच्या घटना

दरम्यानच्या काळात दोन महत्वाच्या घटना घडल्या त्यापैकी एक म्हणजे राजाराम महाराज जिंजीच्या किल्ल्यातून निसटून महाराष्ट्रात परत आल्यावर 2 मार्च 1700 रोजी सिंहगड येथे निधन पावले. दुसरी घटना म्हणजे स्वराज्याची सुत्रे महाराणी ताराबाई यांनी हाती घेतली व मुगलांच्या विरूध्द त्या ठामपणे उभ्या राहिल्या. या दोन्ही घटनांनी मराठयांच्या इतिहासात एक नवे पर्व सुरू केले ताराबाईची कारकीर्द येथूनच सुरू झाली त्यांनी आपले पुत्र शिवाजी राजे यांना गादीवर बसविले व राज्य कारभार चालू केला.

राजाराम महाराजांच्या काळात घोरपडे घराण्याच्या कर्तृत्वाला विशेष उधाण आले होते. त्यात संताजीचा वाटा मोठा होता. पण शेवटच्या दोन तीन वर्षात राणोजीनीही आपली कामगिरी चांगली गाजविली.

**पन्हाळयाचा वेढा**

शिवाजी राजे गादीवर बसले तेव्हा अल्पवयीन असल्यामुळे महाराणी ताराबाईंना रामचंद्रपंत आमत्य यांनी सहाय्य केले. रामचंद्रपंत अमात्य हा खेळण्याहून निघाला व त्याना गडाभोवती असलेल्या मोगलांचे मोर्चे उधळून लावावे या उद्देशाने मराठे पन्हाळगडाजवळ आले. त्यांनी आक्रमणाला सुरवात केली. त्या वाटेने वंजारी लोकांचा तांडा धान्य घेऊन येत होता. मराठयांनी त्यांच्यावर हल्ला केला.10

**अशाच आणखी एका प्रसंगाचे वर्णन पुढीलप्रमाणे आढळते.**

गाजीउद्दीन बहाद्दूर फिरोजजंग (निजाम उल् मुल्कचा बाप) हा देवगड (नागपूरजवळ) जमीनदाराबरोबर लढाई करण्यात गुंतला होता. बादशहाने त्याला बोलावून घेतले (इ.स.1701) संताजी घोरपडयाचा मुलगा राणोजी हा गुलबर्गा जिल्हयात धामधूम करीत होता. त्याचा मोड करण्याची बादशहाने फिरोजजंगला आज्ञा केली. त्यावेळी वाकीणखेडयाचा किल्ला पीड नाईक बेडर यांच्या ताब्यात होता. पीडनाईकाला पराभूत करण्याची कामगीरीही फिरोजजंगला सांगण्यात आले. तो गुलबर्ग्याला गेला व त्या प्रांतात तळ ठोकूण राहिला.[11]

इ.स.1701 आणि 1702 या दोन वर्षात मोघल आणि मराठे यांच्या दरम्यान अनेक ठिकाणी चकमकी उडाल्या. या काळातच पन्हाळगड सारख्या महत्वाचा किल्ला मोगलांच्या ताब्यात गेला (18 मे 1701) त्यानंतर मोगल सैन्य विशाळगड घेण्यासाठी गेले. जुल्फिकारखान तर मराठयांचा पाटलाग करण्याचा कामगिरीवरचा होता. मराठयांच्या बाजुनी धनाजी जाधव प्रमुख सेनानी म्हणून कामगिरी करीत असला तरी राणोजी घोरपडेही त्याच्या बरोबरीने लष्करी मोहीम करीत होता. जुल्फिकारखानाला मराठयांचा पाठलाग करीत जवळजवळ तीन हजार कोस फिरावे लागले. यावरून मराठी सैन्याने किती निकराने आणि चिवटपणाने प्रतिकार चालू ठेवला होता याची कल्पना येते.

## मृत्यू

संताजीनी केलेली कामगिरी त्याचे पुत्र राणोजी याने पुढे चालू ठेवली. राणोजी हा शिपाईगिरीत आपल्या बापाच्या – संताजीच्याही पुढे होता. पण राणोजीला फार थोडे आयुष्य लाभले. त्यांनी राजाराम महाराजांच्या शेवटच्या काळात आणि ताराबाईचे पुत्र शिवाजी राजे यांच्या सुरवातीच्या काळात काही लढायात मोठी कामगिरी केली. तो काळ अतिशय आणिबाणीचा होता. औरंगजेबाच्या फौजांशी सामना देण्यासाठी अनेक ठिकाणी संघर्ष करावे लागले होते. अशाच एका संघर्षात 1702 मध्ये मोगल सरदार हिम्मत खान यांच्याशी लढताना राणोजी घोरपडे मारला गेला. राणोजीला पुत्रसंतती नसल्याने राणोजीची आई सोयराबाई आपल्या दिराकडे म्हणजे बर्हिजी घोरपडे हिंदुराव यांच्याकडे राहू लागली. सोयराबाईचे नेमणूकीस मौजे मंगावती प्रांत हुक्केरी व आणखी काही गावे दिल्याचे आढळते.[12]

राणोजीने गडहिंग्लजचा किल्ला इ.स.1700 ते 1701 च्या दरम्यान बांधला असावा.[13] राणोजीच्या पत्नी संतूबाईला कसबा कापशी सुभा आजरे हा गाव व इतर आणखी उत्पन्न नेमून दिले होते.14 संतूबाई बहुतेक संताजीरावाची द्वितीय पत्नी द्वारकाबाईजवळ रहात होती.

**संदर्भ साधने –**

1. द.वि.आपटे, 'मुधोळ संस्थानाच्या घोरपडे घराण्याचा इतिहास', 1934 पृ.116.
2. स.मा.गर्गे, 'कापशीकर सेनापती घोरपडे घराण्याचा इतिहास', 1974 पृ.79.
3. गो.स.सरदेसाई 'मराठी रियासत, स्थिरबुध्दी राजाराम', 1935 पृ. 231.
4. सेतु माधवराव पगडी, 'मोगल आणि मराठी', 1963 पृ. 139.

5. मा.वि.गुजर, 'करवीर छत्रपती घराण्याचा इतिहासाची साधने', भाग दोन पृ.3. आप्पासाहेब पोवार, 'ताराबाई कालिन कागदपत्रे' खंड पहिला, पृ. 160.
6. सेतु माधवराव पगडी, 'मोगल आणि मराठी', 1963 पृ. 147.
7. स.मा.गर्गे, श.ह.वर्टीकर, 'कापशीकर सेनापती घोरपडे घराण्याचा इतिहास', 1963 पृ. 89.
8. सेतु माधवराव पगडी, 'मोगल आणि मराठी', 1963 पृ. 117.
9. स.मा.गर्गे, श.ह.वर्टीकर, 'कापशीकर सेनापती घोरपडे घराण्याचा इतिहास', 1963 पृ. 94–95.
10. स.मा.गर्गे, 'करवीर छत्रपती घराण्याचा इतिहास', (इ.स.1710 ते इ.स.1883) 1968. पृ. 47.
11. सेतु माधवराव पगडी, 'मोगल आणि मराठी', 1963 पृ. 152.
12. श.ह.वर्टीकर, 'कापशीकर सेनापती घोरपडे घराण्याची कागदपत्रे', 1771 पृ.28
13. Major Graham, 'Statistical Report of Kolhapur' 1649
14. मा.वि.गुजर, 'करवीर छत्रपती घराण्याचा इतिहासाची साधने', भाग दोन पृ.3.